# बीड जिल्ह्यात आभाळ फाटलं







दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








• बीड(महाराष्ट्र) • वर्ष ५ वे • अंक १६७ • मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# ३ लाख हेक्टर खरीप पाण्यात; 200 गावांची वाहतूक ठप्प

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार उडवून दिला. प्रचंड विध्वंस पाहण्यास मिळाला. १६ मध्यम, १२७ लघू प्रकल्प ओसंडून वाहू लागले. सर्वच नद्या, नाल्यांना महापूर आला. बंधारे फुटले, नदीचे पाणी शेतात घुसले, शेकडो गावांची वाहतूक ठप्प झाली. पावसाच्या रौद्ररूपाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. तब्बल तीन लाख हेक्टरवरील खरीप हंगाम पाण्यात बुडाला. काढणीला आलेले सोयाबीन उद्ध्वस्त झाले. हातातोंडाशी आलेला कापसाचा घास नेस्तनाबूत झाला. आष्टी तालुक्यात कांद्याचा चिखल झाला. बाजऱ्यांचे कणसं पाण्यात वाहून गेले. यंदा शेतीतून नफा तर



काहीच नाही. केलेली मेहनत वाया जाणार, यंदा शेती आतबट्ट्याची राहणार. शेती उद्ध्वस्त झाल्याने बीड जिल्ह्यातील शेतकरी चिंतेच्या गर्तेत अडकले आहे.

शेतकऱ्यांना वेशीस अडवण्याचे काम कधी सरकारने केले तर कधी निसर्गाने. पंधरा वर्षापासून शेतकऱ्याला नागवण्याचे काम चालू आहे. कधी नव्हे ते मे महिन्यात पाऊस झाला. मोठ्या उत्साहाने काळ्या आईची ओटी भरली आणि आश्वासक पावसाने धोका दिला. कोरडा दुष्काळ पडतो की काय असे वाटत असतानाच पावसाने दिलासा देण्याचे काम केले. पुढच्याच महिन्यात म्हणजे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात अतिवृष्टी ▶▶ उर्वरित पान २ वर



## ● लष्कराच्या हेलिकॉप्टरने त्यांना सुरक्षितस्थळी हलवले

**अतिवृष्टीमुळे नदीला पूर आल्याने आष्टी तालुक्यातील कडा, सुलेमान देवळा, पिंपरखेड, धानोरा, शिरापुर, टाकळी अमिया आणि डोंगरगण या गावांचा संपर्क तुटला आहे. तसेच कडा गावातील ११ नागरिक तर सुलेमान देवळा ०६, पिंपरखेड ०३, धानोरा ०३, डोंगरगण ०३, शिरापुर १० व टाकळी अमिया १५ असे एकूण सात गावात ५१ लोक अडकलेले आहेत. यासाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण केले आहे तसेच एयरलिफ्टिंग ची व्यवस्था जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणकडुन मा. जिल्हाधिकारी यांचे प्रयत्नांनी करण्यात आलेली आहे. एअर फोर्सच्या माध्यमातून पूर बाधित गावांतील नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्याची कार्यवाही सुरू आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी सैन्यदल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांचे माध्यमातून बचाव कार्य सुरू केलेले आहे. उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी अतिवृष्टी, पूरबाधित गावांतील नागरिकांना आवश्यक ते मदतकार्य तात्काळ करणेबाबत जिल्हाधिकारी यांना सूचित केले.**



*धारूर तालुक्यातील आसरडोह रस्त्यावरील पूल दिंद्र जाणारा रस्त्यावरील पुलाची पिलर तुटल्याने पाण्याच्या प्रवाहाने पिलर तुटून पूल वाहून गेला आहे या रस्त्यावरून मोठी रहदारी असल्याने पावसाच्या पाण्याने रस्ता खचला असून पूल खाली पडला आहे तालुक्यातील आडस होऊन दिंडोळा जाणाऱ्या रस्त्यावरील आसरडो वाण नदीच्या वरील पूल नदीमध्ये बेंड होऊन पडलास आहे या रस्त्यावर सारखी रहदारी असल्याने या रस्त्यावरून जाण्या येण्यासाठी रस्ता बंद झाला आहे दुसरीकडून जाण्यास रस्ता नसल्याने नागरिकांना जाण्यास मोठी अडचण होत आहे तरी या रस्त्यावरील पुलाची दखल घेऊन लवकरात लवकर पुल तयार करून देण्यात यावा व रहदारीचा मार्ग मोकळा करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.*

## अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत; शाळा महाविद्यालयांना सुट्टी

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील पूर्व परिस्थिती विषयी माहिती दिली आहे. आष्टी तालुक्यातील ५२ लोकांना रेस्क्यू ऑपरेशनच्या माध्यमातून सुखरूप पणे सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व परिस्थितीवर प्रशासन अतिशय बारकाईने लक्ष ठेवून आहे. जिल्ह्यातील पूरस्थिती आणि पडणारा पाऊस या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील सर्व शाळांना व म हाविद्यायांना उद्या मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## कुर्ला गावातील शेतकऱ्याची म्हैस पुरात वाहून गेली

**बिंदुसरा नदीला आलेल्या अचानक पुरामुळे दिनांक १५ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजता कुर्ला गावातील शेतकरी श्री. गणेश अच्युतराव पाटील यांची म्हैस वाहून गेली. या घटनेमुळे पाटील कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून ग्रामस्थांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच कुर्ला गावचे ग्राम महसूल अधिकारी श्री. नेवडे सर तसेच मंडल अधिकारी श्री. वाघ सर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी गावातील नागरिकांना पुराच्या काळात घ्यावयाची आवश्यक खबरदारी व सुरक्षा उपाय याबाबत सूचना करण्यात आल्या. सध्या पावसामुळे बिंदुसरा नदीला सतत पूरस्थिती निर्माण होत असून शेतकरी व ग्रामस्थांना सावधगिरी बाळगण्याचे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.**

## बीड पुरात भारतीय लष्करी दक्षिण कमांडच्या थार रॅप्टर्स विमानदलाची जलद बचाव मोहीम

जिल्ह्यात अचानक आलेल्या महापुरामुळे अनेक गावे जलमय झाली आणि काही तासांतच शेकडो कुटुंबे अडकून पडली. या आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देत भारतीय लष्कराने नागरी प्रशासनाच्या सम न्वयाने व्यापक बचाव मोहीम हाती घेतली आहे. दक्षिण कमांडच्या थार रॅप्टर्स ब्रिगेड मधील लष्करी

▶▶ उर्वरित पान २ वर



# बीड जिल्ह्यात पावसाचा कहर

## नागरिकांनी सतर्क राहण्याचे धनंजय मुंडे यांचे आवाहन

- मी प्रशासनाशी संपर्कात, आपत्तीच्या परिस्थितीत प्रशासन किंवा माझ्या कार्यालयास संपर्क करा – धनंजय मुंडे
- प्रशासन अलर्ट मोडवर, नद्या – नाल्यांना पूर, अनेक गावांचा संपर्क तुटला, पुलावरून पाणी, वाहतूक बंद

परळी – अंबाजोगाई तालुक्यांसह बीड जिल्ह्यात सर्वदूर सातत्याने जोरदार पाऊस सुरू असून, मागील २४ तासात अनेक म हसुली मंडळांमध्ये पावसाने अतिवृष्टीची नोंद झाली आहे व त्यापुढेही सतत पाऊस सुरूच आहे. अनेक मोठ्या प्रकल्पांचे दरवाजे उघडल्याने बीड जिल्ह्यात प्रवाह असलेल्या अनेक नद्यांना पूर आला असून, लहान – मोठे सर्वच प्रकल्प भरून नद्या दुथड्या भरून वाहत आहेत, अनेक गावांचा संपर्क तुटला असून, अनेक ठिकाणी पुलावरून पाणी वाहत असून, ▶▶ उर्वरित पान २ वर





*गेवराई विधानसभा मतदार संघातील मौजे पिंपळनेर, लिंबारुई, पाटेगाव, सांडरवन, ता. बीड गावांतील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागांची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकरी व नागरीकांशी संवाद साधून त्यांना धिर दिला. अतिवृष्टीमुळे या भागात शेती आणि पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक नागरीकांच्या घरात नदीच्या पुराचे पाणी गेल्यामुळे नुकसान झाले आहे. प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. पूरग्रस्त भागातील नुकसानीची पाहणी करताना या भागातील मंडळ अधिकारी श्री. सानप, तलाठी व ग्रामसेवक श्री. घुमरे उपस्थित होते.*

## शासनाने अतिवृष्टी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी : आ.संदीप क्षीरसागर

### शेतकऱ्यांना, नागरिकांना स्वतःची आणि आपल्या पशुधनाची काळजी घेण्याचे केले आवाहन

बीड जिल्हासह शहर आणि तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे आणि ग्रामस्थांचे नुकसान झाल्याने शासनाने नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड शहर व तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर काल रात्रीपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे बिंदुसरा तसेच इतर छोटे-मोठे तलाव,नदी,ओढे तुडुंब भरले असून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. काल रात्री झालेल्या पावसाने पीक, पशुहानी,



शेतकरी बांधव व ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये बंजारा समाजाचा मोठा मोर्चा, आंदोलक रस्त्यावर; ST प्रवर्गातील मागणीला खासदारांसह ६ आमदारांचा पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा संदर्भ देत मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतल्याने बहुतांश मराठा बांधवांना ओबीसीतून आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. त्याम ुळे, ज्याप्रमाणे हैद्राबाद गॅझेटियरमध्ये मिळालेल्या नोंदीनंतर मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून (जइउ) आरक्षण देण्याचा जीआर काढला. त्याचप्रमाणे गॅझेटियर नोंदीचा संदर्भ घेऊन बंजारा सम



ाजानेही एसटी प्रवर्गातील आरक्षणाच्या मागणीसाठी ताकद दाखवायला सुरुवात केली आहे. राज्यभरातून बंजारा समाज एकटवत असून एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करत आहेत. त्यातच, आज बीडमध्ये (इशशव) बंजारा समाज मोठ्या ताकदीने रस्त्यावर उतरला असून जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर मोठा म ोर्चा काढण्यात आल्याचं पाहायला मिळत आहे. बीडसह जालन्यातही आज बंजारा समाजाने एसटी प्रवर्गातील आरक्षणाच्या मागणीसाठी मोर्चा काढला आहे.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाच्या मागणीसाठी एकमेकांच्या विरोधात उभा टाकलेले नेते बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरल्याचं दिसून आलं. बंजारा समाजाच्या आजच्या मोर्चाकडे राजकीय नेत्यांनी पाठ फिरवली आहे, मात्र बंजारा समाज मोठ्या संख्येनं मोर्चात सहभागी झाला आहे. राज्यातील मराठा आरक्षणाचा ▶▶ उर्वरित पान २ वर




# बीडच्या रेल्वे मार्गाचा इतिहास; स्व.केशरकाकूंच्या प्रयत्नाला सलाम









अहमदनगर-बीड-परळी नवीन रेल्वे मार्ग हा सर्वोच्च प्राधान्याने राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांपैकी एक आहे. सर्वात महत्त्वाच्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांपैकी एक असलेला हा प्रकल्प आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र जोडणारा हा महत्त्वाचा रेल्वे मार्ग २६१.२५ किलोमीटर लांबीचा आहे. त्यापैकी अहमदनगर ते बीड हे काम जवळपास पूर्ण झाले असून विद्युत जोडणी बाकी आहे,लवकरच नगर ते बीडपर्यंत रेल्वेमार्गाचे काम पूर्ण होणार असून मराठवाड्यातील प्रवाशांचा प्रवास सोपा आणि सुखकर होणार आहे.या रेल्वे मार्गासाठी कोणत्या काळात कुणी कोणते काम केले हेही नवीन पिढीला माहीत होणे गरजेचे आहे,मुळातच तत्कालीन खा केशरकाकू क्षीरसागर यांनी केलेला प्रयत्नांना सलाम करावा असा इतिहास आहे,स्व काकूंचा पाठपुरावा आणि माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केलेली अर्धा खर्च राज्य सरकारने उचलण्याची महत्वाची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे केली व त्यांनी मंजूर केली आणि आजतागायत सुरू राहिली म्हणूनच हा रेल्वे मार्ग आज पूर्ण होताना आपण बघत आहोत यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे ते नाकारता येत नसले तरी खरी माहिती देखील दृष्टीआड करता लपवता येणार नाही,स्व गोपीनाथराव मुंडे,बीडचे नगराध्यक्ष डॉ भारतभूषण क्षीरसागर,जेष्ठ संपादक स्व नामदेवराव क्षीरसागर,स्वातंत्र्य सैनिक स्व बन्सीधरराव जाधव,स्व हिरालाल सारडा,स्व मदनलाल सारडा,जेष्ठ उद्योजक सत्यनारायण लाहोटी,गो गो मिसाळ,अतहर बाबर, जेष्ठ नेत्या उषा दराडे, सुशीला मोराळे,स्व अमोल गलधर,गिरीश देशपांडे,डॉ अरुण भस्मे,पत्रकार गुलाब भावसार,नटवर लाल बुद्धदेव,नामदेव चव्हाण आणि अशा अनेकांचा सहभाग या मागणीसाठी होता आणि आहे

अहमदनगर-बीड-परळी हा रेल्वेमार्ग जिल्ह्यासाठी महत्त्वाचा विकास प्रकल्प आहे.त्यावेळी खा केशरकाकू यांनी तत्कालीन तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांना भेटून १९९५ मध्ये तांत्रिक मान्यता देऊन हा रेल्वेमार्ग मंजूर करण्यात आला. या २६१ किलोमीटरच्या मार्गाला सुरूवातीला केवळ ३५३ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. पुढे यासाठी ४४५० कोटींचा निधी प्रस्तावित झाला,यासाठी केंद्राकडून इतका निधी एकाच वेळी मिळणे शक्य नव्हते या साठी लागणाऱ्या निधीची तरतूद केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे करावा अशी आग्रही मागणी तत्कालीन मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केली आणि मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीही हिरवा कंदील दिला आणि खऱ्या अर्थाने या मार्गाला गती मिळाली नेमकी हीच बाब आज मैलाचा दगड झाली,हा रेल्वे मार्ग व्हावा यासाठी स्व काकूंनी नेमके काय काय प्रयत्न केले हेही कळायला हवेत ते या ठिकाणी देत आहोत

बीड जिल्ह्यातील विकासाच्या संदर्भात स्व काकूंनी स्वतः प्रयत्न करत असताना रेल्वे मार्ग आणि दूरदर्शन या दोन प्रमुख मागण्यासाठी बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक व लोकप्रतिनिधीचे शिष्टमंडळ घेऊन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी,राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग,शंकर दयाळ शर्मा यांची भेट घेऊन या दोन आग्रही मागण्या मांडून चर्चा केली होती सर्वात प्रथम रेल्वे संदर्भात १९८० साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग, डॉ शंकर दयाल शर्मा आणि तत्कालीन रेल्वेमंत्री गणी खान चौधरी ,जाफर शरीफ माधवराव शिंदे यांना भेटून स्व.काकूंनी बीड जिल्ह्याच्या या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते,सुरुवातीला सौताडा मार्गे नगर असा सर्व्हे झाला त्यावेळी रेल्वे खात्याने आर्थिकदृष्ट्या हा रेल्वे परवडणारा नसल्याचे कळवले होते तेव्हा स्व काकूंनी बीड जिल्ह्याचा विकास करायचा असेल तर हा न परवडणारा मार्ग अंमळनेर मार्गे करणे आवश्यक असल्याचे म्हटले तेव्हा या संदर्भात स्व इंदिरा गांधी यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करून सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या परंतु १९८४ साली ऑक्टोबर महिन्यात इंदिरा गांधी यांची हत्या झाली, राजीव गांधी पंतप्रधान झाले त्यानंतर १९८५ ला देशात निवडणुका लागल्या आणि स्वर्गीय राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले तेव्हा स्वर्गीय काकूंनी राजीव गांधी यांच्याकडे सातत्याने रेल्वे संदर्भात पाठपुरावा केल्यानंतर नगर बीड परळी रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण सुरू झाले १९८९-९० साली देशात सार्वत्रिक निवडणूक झाली या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला होता,तेव्हा या मागणीला खंड पडला,स्वर्गीय काकूंचा पराभव झालेला असतानाही त्यांनी या मागणीचा पाठपुरावा सोडला नाही,१९९१ साली पुन्हा देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या काँग्रेस पक्ष स्वर्गीय राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढत होता प्रचारादरम्यान राजीव गांधी यांची हत्या झाली तेव्हा केशर काकू बीडमधून निवडून आल्या होत्या त्यावेळी देशाचे पंतप्रधान म्हणून स्व नरसिंहराव हे पंतप्रधान झाले त्या काळात रेल्वेमंत्री म्हणून सुरेश कलमाडी हे होते या काळात केशर काकू क्षीरसागर यांनी प्रयत्नांची शिकस्त करून नरसिंहराव यांच्याकडे आग्रही भूमिका मांडली आणि मंजुरीही करून घेतली तेव्हाच तत्कालीन अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी रेल्वे बजेट मध्ये बीडसाठी निधीची घोषणा करून ती मंजूर केली आणि पुढच्या कामाला सुरुवात देखील झाली

पंधरा वर्षापासून मी खासदार आहे १९८० च्या पहिल्या निवडणुकीपासून मी बीड जिल्ह्यातील जनतेला रेल्वेचे आश्वासन दिले आहे मला स्वर्गीय इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी आश्वासन दिले होते परंतु ते दुर्दैवाने आता नाहीत तेव्हा माझा हा प्रश्न निकाली काढावा अशी कळकळीची विनंती स्वर्गीय केशर काकू यांनी नरसिंहराव यांच्याकडे केली केली होती त्याचवेळी नरसिंहराव यांनी या रेल्वे मार्गाला हिरवा कंदील दाखवत मंजुरी देऊन टाकली प्रणव मुखर्जी त्यानंतर चंपावती क्रीडा मंडळाच्या मैदानावर या रेल्वे मार्गाचे भूमिपूजन तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश कलमाडी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले १९९९ ते २००४ यादरम्यान पुन्हा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे विधानसभा निवडणुकीत चौसाळा मतदार संघातून विजयी झाले आणि राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला त्यावेळेस राज्याचे मुख्यमंत्री म्हणून स्वर्गीय विलासराव देशमुख हे होते नगर बीड परळी रेल्वे मार्गाला केंद्राकडून पाहिजे तसा निधी मिळत नसल्यामुळे माजी मंत्री क्षीरसागर यांनी मंत्रिमंडळ बैठकीत याविषयी आग्रही मागणी करून राज्य सरकारचा ५० टक्के वाटा दिल्यास हा रेल्वे मार्ग होऊ शकतो असा प्रस्ताव मांडला विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने ती मागणी मंजूर झाली आणि ती आजतागायत पुढेही चालू आहे,यामुळेच राज्य सरकारचा पन्नास टक्के वाटा या मार्गाला मिळत राहिला आणि या मार्गाचे काम पुढे होत गेले,या रेल्वे मार्गाच्या निधीसाठी वारंवार पाठपुरावा करत प्रत्येक सरकारच्या काळात रेल्वे मंत्र्यांना भेटून वाढीव निधीसाठी प्रयत्न करत राहिल्या,तत्कालीन मंत्री सुरेश कलमाडी, लालू प्रसाद यादव,जाफर शरीफ,सुरेश प्रभू ही नेते मंडळी स्व काकूंची भेट होताच बीडच्या रेल्वेबाबत चर्चा करत असत म्हणजे जोपर्यंत काकू खासदार होत्या तोपर्यंत बीड रेल्वे साठीची त्यांची तळमळ लक्षात घेत होते

एकंदरीतच स्व काकूंनी अहमदनगर बीड परळी रेल्वे मार्गासाठीचा संघर्ष तब्बल २० वर्ष केला होता,या काळात हा मार्ग मंजूर होणे,सर्वेक्षण होणे,भूसंपादन होणे,रेलबजेटमध्ये निधी मिळवणे,माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची आग्रही मागणी मंजूर होणे राज्य सरकारचा ५० टक्के वाटा मिळणे आणि पुढे हे काम जलदगतीने सुरू होणे आणि आता नगर बीड हा रेल्वे प्रवास सुरु होणे असा आहे

या रेल्वे मार्गासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद

**- प्रशांत सुलाखे,बीड**

◆ पान ९ वरून पुढे...

## ३ लाख...

झाली. प्रचंड नुकसान झाले. पिकांची वाढ खुंटली. एक लाख हेक्टरवरील पीक पाण्यामध्ये होते.त्यातूनही कसेबसे सावरणारा शेतकरी दोन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने अक्षरशः उद्धवस्त झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला. काढणीला आलेले सोयाबीन, पाण्याखाली हरवले. शेतामध्ये गुडघ्याएवढे पाणी घुसले. कापूस, बाजरी आडवी झाली. कांद्याचा चिखल झाला. वर्षभर काबाड कष्ट करून सोनं पिकवलेल्या शेतकऱ्यांच्या घामाची माती झाली. बीड जिल्ह्यात तीन लाख हेक्टरवरील खरीप हंगाम पाण्यामध्ये नेस्तनाबूत झाला. ओढ्या नाल्याचे आणि नदीचे पाणी शेतीत घुसले. प्रचंड नुकसान झाले. आता काय खावे आणि वर्ष कसे काढावे या चिंतेमध्ये शेतकरी थरथरणाऱ्या हाताने आणि लुकलुकणाऱ्या डोळ्याने पाण्यात तरंगत असलेल्या पिकांकडे पाहतच राहिला. अर्धा खरीप सध्या पाण्यामध्ये बुडालेला आहे. पंचनामे होतील, तुटपुंजी मदतही मिळेल मात्र बरकत येणारे धान्य यंदा लक्ष्मीच्या रूपाने घरात येते की नाही याबाबत शेतकऱ्यांनाच आता विश्वास राहिला नाही.

## अतिवृष्टीमुळे...

मात्र १७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन असल्याने त्याच्या पूर्वतयारीसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना सुट्टीतून वगळण्यात आले असल्याचे पत्रात म्हटले आहे.

## बीड पुरात...

विमानदलाची हेलिकॉप्टर्स अल्पावधीतच पाचारण करण्यात आली. प्रतिकूल हवामान व कठीण उड्डाण परिस्थितीला तोंड देत वैमानिकांनी दुर्गम व जलमग्न भागांत प्रवेश करून अडकलेल्या नागरिकांची सुटका केली. महिलांसह मुले व ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येत असून, सततच्या उड्डाणांद्वारे बचाव कार्य अखंडपणे सुरू आहे. एनडीआरएफ व राज्य यंत्रणांच्या सहकार्याने राबविण्यात आलेली ही मोहीम, नागरिकांच्या जीवित रक्षणासाठी भारतीय लष्कराची अखंड वचनबद्धता आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्वरित मदत करण्याची तत्परता अधोरेखित करते.- अंकुश चव्हाण, आय.आय.एस., जनसंपर्क अधिकारी, संरक्षण, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, मुख्यालय दक्षिण कमांड, पुणे.

## बीड जिल्ह्यात ...

बरेच रस्ते बंद देखील करण्यात आले आहेत. याच पार्शवभूमीवर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना सतर्क राहून काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. धनंजय मुंडे यांनी आपण सातत्याने प्रशासनाच्या संपर्कात असून, जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर असल्याचे म्हटले आहे. वीज प्रवाह, तारा, खांब आदी ठिकाणांपासून दूर राहावे, वाहत्या पाण्यात वाहने घालू नयेत किंवा पुलावरून पाणी वाहत असल्यास त्यातून पादचारी किंवा वाहने घालू नयेत, धोकादायक किंवा पडझड झालेल्या घरापासून सुरक्षित स्थळी जावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे. दरम्यान सततच्या पावसाने जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठ्या नद्यांना पूर आले असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे तर अनेक ठिकाणी रस्त्यावरील वाहतूक खोळंबली आहे. कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीत जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन कक्ष किंवा आपत्ती परिस्थितीत कोणत्याही मदतीसाठी माझ्या कार्यालयास संपर्क साधावा, असेही आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

## शासनाने अतिवृष्टी...

फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना.अजित दादा पवार तसेच बीडच्या जिल्हाधिकारी यांना बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्र देऊन केली आहे. बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर (का) तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये दि.२८ ऑगस्ट २०२५ दरम्यान झालेल्या आणि १३ सप्टेंबर २०२५ पासून ते आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने क्षेत्रातील उभा असलेला सोयाबीन, कापूस, बाजरी आदी पिकांचे तथा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी बांधवांच्या पाळीव पशुधनाचे देखील नुकसान झाले आहे. यासह शहरी व ग्रामीण भागात देखील पावसामुळे मोठी पडझड झाली आहे. आजपर्यंत सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने विद्युत पोल, तारा व रोहित्र नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना व ग्रामस्थांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी, नागरिकांनी स्वतःची आणि आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी: पूर परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी व नागरिकांना स्वतःच्या आणि आपल्या पशुधनाची सुरक्षिततेसाठी काळजी घेण्याचे तसेच आज दिवसभर अतिवृष्टीची शक्यता वर्तवली आहे त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडा तसेच आपल्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाशी संपर्कात राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. आ.संदीप भैय्यांनी अधिकाऱ्यांना खबरदारी घेण्याच्या सूचना करत तात्काळ पंचनामे करण्यासाठी पत्र दिले: अतिवृष्टीमुळे मतदार संघातील सर्वच तलाव पुर्ण क्षमतेने भरलेले आहेत. अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जायकवाडी यांना खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना कार्यकारी अभियंता यांना रस्ते व पुलाचे तात्काळ पंचनामे करणेसाठी पत्र व्यवहार देखील केला आहे.

## बीडमध्ये बंजारा...

आंदोलनाचे केंद्रस्थान म्हणजे बीड. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांना सर्वाधिक पाठिंबा मिळालेला जिल्हा म्हणजे ही बीड. आरक्षणाच्या मुद्द्यावरून ओबीसी नेते, ओबीसी जनता, मराठा नेते, मराठा जनता येथे एकमेकांविरोधात उभा राहिलेला जिल्हाही बीड. या जिल्ह्यात बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गातून आरक्षणाच्या मागणीसाठी जिल्ह्यातील सर्वच नेते एकवटलेले पाहायला मिळाले. बीडमधील खासदारांसह ६ आमदारांचा पाठिंबा: बीड लोकसभेचे खासदार बजरंग सोनवणे यांनी उघडपणे बंजारा समाजाच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. धनंजय मुंडे बंजारा समाजासाठी रस्त्यावर उतरलेले पाहायला मिळाले. सुरेश धस , विजयसिंह पंडित नव्हे, तर जिल्ह्यातील सर्वच ६ आमदारांनी बंजारांच्या एसटी प्रवर्गातील आरक्षणाच्या मागणीसोबत उभं राहण्याची भूमिका घेतली आहे. बीड जिल्ह्यात लोकसंख्या अडीच लाख: बीड जिल्ह्यात बंजारा समाजाची लोकसंख्या अडीच लाखांच्या घरात, तर एक लाख ९० हजार मतदार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदारसंख्या असल्यानं कोणताही पक्ष या समाजाला नाराज करू शकत नाही. गेवराई विधानसभा मतदारसंघात बंजारा समाजाचं एकट्याचे तब्बल ६३ हजार मतदार आहेत. त्यामुळे स्थानिक आमदार विजयसिंह पंडित यांनीही मोर्चाला उघड पाठिंबा दिला. जिल्ह्यातील १२८६ लमाण तांडे समाजाच्या संघटनशक्तीचे द्योतक आहेत.

### भावपूर्ण श्रद्धांजली



कळवण्यात अत्यंत दुःख होते की, प्रा. धर्मराज सोपानराव मुंडे यांची मुलगी सौ. सारिका बालासाहेब खाडे हिचे दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. तिचा अंत्यविधी उद्या दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ९:०० वाजता मौजे खाडे वाडी जवळा पाटी (दिंद्रुड) बीड परळी रोड या ठिकाणी होणार आहे.


## अटल अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि बीड

Reg. No. : BHR/BHR/RSR/CR/154/2022

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
### (फक्त सभासदासाठी )

आपल्या संस्थेची तृतीय वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि २९/०९/२०२५ रोजी दु ठीक -१.३० वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय,बांगर कॉम्प्लेक्स,पंढरी नगरी समोर धानोरा रोड बीड येथे होणार आहे .सदरचे सभेस सर्व सभासद बंधू,भागिनीनी हजर रहावे हि विनती.

**● सभेपुढील विषय ●**

- विषय क्र १.मागील सभा दि २९/०९/२०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिव्रत वाचून कायम करणे.
- विषय क्र २.सन दि ३१/०३/२०२५ अखेरचा ताळेबंध व दि ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरचा नफा तोटा पत्रकास मान्यता देणे बाबत.
- विषय क्र ३- सन २०२४-२०२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत
- विषय क्र ४ -सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
- विषय क्र ५ सन २०२४-२०२५ च्या लेखापरीषण अहवालाच्या दोष दुरुस्तीस मान्यता देणे.
- विषय क्र ६ सन ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ कालावधीचे झालेले वेद्यनिक लेखा परीषण अहवाल सिकृत करून मंजुरी देणे.
- विषय क्र ७- सन २०२५ -२०२६ या साला करिता संस्थेचे लेखापारीस्काची नियुक्ती करणे बाबत
- विषय क्र ८- राज्यातील नागरी आणि ग्रामीण /बिगरशेती सहकारी पतसंस्थांना लागू केलेला सुधारित आदर्श उपविधी सिकृत करून मंजुरी देणे.
- विषय क्र ९-आयत्या वेळी मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे विषयावर चर्चा व विचार विनिमय करून निर्णय करून देणे.

दि. १६/०९/२०२५ मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

ठिकाण : बीड **व्यवस्थापक**

**● सभासदांना नम्र सुचना :**

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी ज्या सभासदास सभेपुढे असलेल्या विषयाबद्दल काही माहिती विचारावयाची असल्यास त्यांनी दि. १९/०९/२०२५ पर्यंत मुख्य कार्यालयास लेखी कळवावे अन्यथा त्यांचा विचार केला जाणार नाही.

आवश्यक असलेला कोरम सभेच्या सुरूवातीस नसल्यास सभेच्या कामास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सभेस सुरूवात केली जाईल. या सभेस पोटनियम ३५ (३) प्रमाणे कोरमची आवश्यकता असणार नाही. सभासदांनी आपल्या वारसाची नोंद करून घ्यावी.


◆ पान ४ वरून पुढे...

## डॉ. बाबासाहेब...

चालू होती टेस्टिंग नंतर पुन्हा काही बीडला रेल्वे आली नाही परंतु बीडच्या रेल्वेच्या करिता प्रत्येक गावाला खालून जाण्याकरिता जी बोगदे तयार करण्यात आले आहेत त्या प्रत्येक बोगद्यात ५ फुठा पेक्षा जास्त जास्त पाणी साठले आहे बीड जिल्हा आधीच बदनाम असताना बीडच्या रेल्वेच्या कामाकरिता आलेले अभियंते देखील हुशार नसावेत अन्यथा कॉप्या करून पास झालेले असावेत त्यामुळेच त्यांना चांगले बांधकाम करता येत नाही प्रत्येक बोगद्यात नियोजन न करता चुकीच्या पद्धतीने बांधकाम केल्यामुळे व त्याचे नियोजनाचे अभाव असल्यामुळे प्रत्येक बोगद्यातून जमा झालेल्या पाण्याचे निचरा होत नसल्याने रेल्वेने बांधलेल्या प्रत्येक प्रवासी बोगद्यात जास्त पाणी साठले आहे याचे मूल्यमापन करण्याकरिता ना कोणता अधिकारी याकडे लक्ष देत आहे या सर्व गोष्टीचा सर्वसामान्य जनतेला त्रास आहे नेमके याकरिता न्याय कोणाकडे मागायची विनाकारण पावसाळ्यातली चार महिने याच पाण्यातून डोंगर पट्टातील सर्व नागरिकांना येजा करावी लागणार आहे यामुळे राज्य सरकार व केंद्र सरकार यांचे प्रतिनिधित्व करणारे बीड जिल्ह्यातील अधिकारी यांनी यात तात्काळ लक्ष घालावं अशी मागणी करण्यात आली आहे.

## लिंबागणेश ते...

पुल पावसाळ्यात वारंवार वाहून जात असल्याने येथे कायमस्वरूपी उपाय म्हणून कमानी पुल बांधावा, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## खरात आडगाव...

होता यावेळी प्रमुख माजलगाव ओबीसी नेते संतोष रासवे जगन्नाथ खेत्री दशरथ आढाव किशोर पाचाळ निवृत्ती रासवे प्रकाश आढाव बंडु रासवे साहेबराव आढाव बाबा हांके विलास मेमाणे वैभव पाचाळ बंटी यमगर मछिंद्र आढाव लखण आढाव कोरबे सचिन रासवे बाबासाहेब आढाव दिवटे मंगेश रासवे शिवाजी आढाव गडदे दत्ता विसवळे समाधान रासवे आनंत आढाव पुरुषोत्तम यमगर संतोष कावळे अशोक मामा रासवे महादेव नाना आढाव बाबुराव हांके अशोक शिंदे कपिल रासवे परसु आढाव बहुसंख्य नेते उपस्थित होते

## चौसाळा महसूल...

साहेब यांनी पिकासह व पूर परिस्थितीची पाहणी केली. यावेळी तलाठी साहेबांनी पिक पाहणीची, व पूर परिस्थिती माहिती वरिष्ठ अधिकारी यांना तात्काळ कळविली आहे .व नदीकाठच्या लोकांनी सतर्क राहण्याचे व पुराच्या पाण्यात न उतरण्याचे आवाहन केले.

## लोकनेते सुंदररावजी...

कारभार अधिक सक्षम आणि गतिमान होणार असल्याची खात्री व्यक्त केली जात आहे. बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व संचालकांनी श्री. सोळंके यांच्या नेतृत्वावर एकमताने विश्वास व्यक्त केला असून, त्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. सविस्तर वृत्त असे की, या निवडीबद्दल माजलगाव व परिसरातील नागरिक, संस्थेचे सभासद, स्थानिक शेतकरी, व्यापारी वर्ग, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय व्यक्तिमत्त्वांसह विविध सामाजिक संघटनांकडून श्री. सोळंके यांचे हार्दिक अभिनंदन होत आहे. लोकनेते सुंदररावजी सोळंके हे या भागातील सहकारी चळवळीचे अग्रणी व्यक्तिमत्त्व होते आणि त्यांच्या नावावर असलेल्या या दोन्ही संस्थांचे आता त्यांच्या वारसाच्या हाती एकत्रित नेतृत्व आल्याने येथील सहकारी चळवळीला नवी दिशा मिळणार असल्याची व्यापक अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक समुदायाने या दुहेरी जबाबदारीच्या निवडीचे स्वागत केले आहे आणि श्री. सोळंके यांच्या अनुभवी नेतृत्वामुळे दोन्ही संस्थांच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा होणार असल्याची आशा व्यक्त केली जात आहे. या प्रसंगी बोलताना श्री. वीरेंद्र सोळंके यांनी संस्थेच्या आर्थिक विकासासाठी, सदस्यांच्या कल्याणासाठी, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी आणि साखर कारखान्याच्या उत्पादनक्षमतेत वृद्धी करण्यासाठी आणखी नवे उपक्रम राबवण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला आहे. त्यांनी उल्लेख केला की, संस्थेने नुकताच ९० कोटी रुपयांच्या ठेवीचा महत्त्वाचा टप्पा यशस्वीरीत्या पार केला आहे आणि मार्च २०२६ पर्यंत १२५ कोटी रुपयांच्या ठेवीसह एकूण व्यवसाय २०० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य त्यांनी ठेवले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, दोन्ही संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी, त्यांच्या जीवनमानात सुधारणा आणण्यासाठी तसेच भविष्यकाळातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. या निवडीमुळे माजलगाव परिसरातील सहकारी क्षेत्राच्या विकासाला गती मिळणार असून, शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली जाणार असल्याची तसेच संस्थेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन सदस्यांना अधिक फायदे मिळणार असल्याची अपेक्षा स्थानिक समुदायाने व्यक्त केली आहे. संचालक मंडळातील सर्व सदस्यांनी त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या असून, संस्थेच्या प्रगतीसाठी सामूहिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीडच्या रेल्वे कार्यक्रमाला काळे झेंडे दाखवुन निषेध करणार: हरिभाउ सोळंके यांचा प्रशासनाला इशारा



## स्व. विलासराव देशमुखांच्या कुटूंबीयांना कार्यक्रमाला बोलावण्याची मागणी

**माजलगाव। प्रतिनिधी**

बीडच्या रेल्वेप्रश्नी मंत्रालयात आवाज उठविणा-या व बीड जिल्ह्यात रेल्वे आणण्याकरिता आग्रह भुमिका घेणा-या तत्कालिन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या कुटूंबीयांना प्रशासनाच्या वतीने दि. १७ सप्टेंबरच्या सोहळ्यास बोलावुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी अन्यथा बीडच्या रेल्वे कार्यक्रमाला काळे झेंडे दाखवुन निषेध करणार अशा इशारा काँग्रेसचे हरिभाउ भगवान सोळंके यांनी प्रशासनाला निवेदनाव्दारे दिला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्वातंत्र्यापासून बीड जिल्हा रेल्वेचे स्वप्न पाहत होता. त्यासाठी स्व. खा. केशर काकु क्षिरसागर यांनी पहिल्यांदा रेल्वेबाबत आवाज उठविला. त्यांपासून अनेक खासदारांनी प्रयत्न केले. स्व. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असतांना मंत्रालयात रेल्वे अधिका-यांची बैठक घेत महाराष्ट्र शासन बीडच्या रेल्वेच्या खर्चाचा ५० टक्के वाटा उचलित आहे असे पत्र देत निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आजघडीला बीड जिल्ह्याचे रेल्वेचे स्वप्न पुर्ण होत आहे. आज विलासराव देशमुख हयात नाहीत, त्यांची मुल हे शेजारी जिल्ह्यातील लातूर येथे कार्यरत आहेत. त्यामुळे बीड जिल्हा व रेल्वे प्रशासनाने त्यांच्या कुटूंबातील कोणालाही दि. १७ सप्टेंबरला होणा-या रेल्वे सोहळ्यास बोलावून त्यांचा यथोचित सत्कार करावा अन्यथा या कार्यक्रमास काळे झेंडे दाखवुन बीड जिल्हा प्रशासन व रेल्वे प्रशासनाचा जाहिर निषेध करण्याचा इशारा जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासनास काँग्रेसचे हरिभाउ भगवान सोळंके यांनी प्रशासनाला निवेदनाव्दारे दिला आहे.

# पैसे छापायच्या ‘सप्तरंगी’ मशीन गरीब महिलांना : मुफ्ती अब्दुल्लाह

## अरबाज भाईच्या मशीनने सलोख्याचा धागा विणला, गरीब महिलांना स्वावलंबी करणारा उपक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

गरीब व विधवा महिलांना शिलाई मशीन देऊन रोजगार उपलब्ध करून देणे म्हणजे ही शिलाई मशीन पैसे छापण्याची मशीन असल्याचे प्रतिपादन मुफ्ती अब्दुल्लाह यांनी केले ते सप्तरंग प्रतिष्ठान च्या मशीन वाटप उपक्रमाचे पाहुणे म्हणून बोलत होते.

दिनांक १५/०९/२५ रोजी सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठान आयोजित स्त्रियांच्या स्वावलंबनासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी सिलाई मशीन वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. ज्यात जिल्हाभारतातून शेकडो सदस्य मोमिनपुरा स्थित सिटी लॉन्स येथे एकत्र जमले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रतिष्ठानचे पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथींनी महिलांनी स्वावलंबनाच्या दिशेने पाऊल टाकावे, घरबसल्या रोजगार निर्माण करून कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लावावा, असे आवाहन केले.

शिलाई मशीन प्राप्त केलेल्या लाभार्थी महिलांनी समाधान व्यक्त करत सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठानचे आभार मानले. संस्थेतर्फे पुढील काळातही महिलांच्या सबलीकरणासाठी विविध उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरबाज पठाण यांनी दिली. यावेळी प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा शेख नदीम सर तर प्रस्ताविक सुफियान मनियार यांनी केले. यावेळी गेवराई वरून शेख अलीम नगर सेवक आजू भाई, टायगर ग्रुप चे राकेश जाधव, बरकत लाला, समीर शेख, सफदर देशमुख, समीर सरकार, साजेद पाशा, वसीम मनियार, युवा नेते रफिक पटेल, माजलगाव वरून अखिल भाई, नादीम शेख, मोमीन सिराज, सिद्दीकी इनामदार, मुखीद सय्यद आदींची उपस्थिती व मेहनत केली.



### मान्यवराकडून अरबाजचे कौतुक

उपक्रम माणुसकी ला बळ देणारा - माजी आ सिराज भाई

अरबाज भाई अल्लाहने पाठवलेला खिदमत गार - प्रवक्ते भागवत तावरे

सप्तरंग च्या मोहिमेत खांदाला खांदा देऊ - शफिक भाऊ

अरबाज भाई खिदमत खल्क चा पाईक - फारूक पटेल

अरबाज खिदमत का सिपाई - रिहाना बाजी

# ’विश्व हॉस्पिटल’चा रुग्णसेवेचा वसा अखंडपणे चालूच

**बीड । प्रतिनिधी**

बीड सारख्या मागासलेल्या शहरात आपल्या शहराची गरज ओळखून गेल्या ५ वर्षांपासून प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर हे विश्व हॉस्पिटल च्या माध्यमातून अविरत सेवा देत आहेत त्यांनी आज वर अतिशय जोखमीच्या व गुंतागुंतीच्या समजल्या जाणाऱ्या अवघड व किचकट अशा मेंदूच्या शस्त्रक्रिया करून अनेकांना पुनर्जन्म तर दिलाच आहे पण ओपीडी च्या माध्यमातून देखील हजारो रुग्णांना रात्र रात्र न मिळणारी झोप आज शांत झोपेत रूपांतरित करून त्यांचे दुःख दूर केले आहे तसेच अनेक वेळा पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरातील नावाजलेले डॉक्टर्स व हॉस्पिटल च्या माध्यमातून अनेक प्रकारच्या भव्य आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून देखील सेवेचे हे व्रत अखंडपणे चालूच आहे तसेच हजारो रुग्णांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या



समाधानी प्रतिक्रिया देखील मिळत आहेत त्यामुळे दरवर्षी प्रमाणे येत्या गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून विश्व हॉस्पिटल बीड व सह्याद्री हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील नामांकित न्यूरोसर्जन सचिन महाजन व बीड येथील बीड करांच्या नसांचा उपचार करत बीड करांची नस ओळखणारे आपल्या प्रेमळ स्वभाव व आपुलकीने बोलण्यामुळे सर्वांना आपल्या घरातीलच एक वाटणारे आपले लाडके व प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांच्या उपस्थितीत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे याचा सर्व रुग्णांनी लाभ घ्यावा. शिबिरामध्ये एएऋ(मेंदूचा आलेख ) सारखी तपासणी देखील योग्य दरात करण्यात येणार आहे तसेच या दोन्ही तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे..! सर्वांनी आपल्या आसपासच्या लोकांना,नातेवाईकांना, मित्र मंडळींना दिनांक १८ सप्टेंबर गुरूवार रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत विश्व हॉस्पिटल शिवाजी नगर पोलिस स्टेशन च्या बाजूला, बार्शी रोड, बीड या ठिकाणी ०२४४२-२९५१५१, ८२०८९५२४४२ या नंबरवर नाव नोंदणी करून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्व हॉस्पिटल चे सर्वेसर्वा डॉ विशाल पिंगळकर सर व विश्व हॉस्पिटल च्या सीईओ डॉ. सौ. स्वप्नजा विशाल पिंगळकर आणि विश्व हॉस्पिटल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी योगतज्ञ डॉ. राधा सचिन तांबे यांना नवी मुंबई येथे आयुष महासन्मान पुरस्कार प्रदान

**बीड । प्रतिनिधी**

योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी डॉ. राधा सचिन तांबे यांना आयुष महासन्मान पुरस्कार २०२५ (योगा नॅचरोपॅथी) प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम नवी मुंबई येथील हॉटेल रॅडिसन याठिकाणी दिमाखात पार पडला ,या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नितीन राजे पाटील, अभिनेत्री श्रेया बुगडे (चला हवा येऊ द्या फेम), तसेच मंगला कोहली - सल्लागार, युनायटेड नेशन महिला व बाल विभाग, तसेच आमदार चिखली श्वेता ताई महाले आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




डॉ. राधा सचिन तांबे यांनी मागील ६ वर्षांपासून योग प्रशिक्षक म्हणून कार्य करत समाजात आरोग्य आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश दिला आहे. त्यांनी तीन आंतरराष्ट्रीय योग स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळवले असून राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरही अनेक पुरस्कार पटकावले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.त्या राधिका अँडव्हान्स योग सेंटर, बीड या संस्थेच्या संचालिका आहेत. या माध्यमातून त्या ऑनलाईन आणि ऑफलाईन योग वर्ग घेऊन अनेक लोकांपर्यंत योग पोहोचवत आहेत. तसेच विविध योग शिबिरे आयोजित करून लोकांमध्ये योगाचे महत्त्व, आरोग्याची जाणीव आणि मानसिक शांततेचा संदेश पोहोचवत आहेत.

डॉ. तांबे त्या चराठा प्राथमिक आरोग्य केंद्र, बीड येथे योग प्रशिक्षक म्हणूनही कार्यरत असून ग्रामस्तरावर आरोग्य जागरूकता निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना नियमित योगाभ्यासाची प्रेरणा मिळाली असून त्यांनी आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यास मदत केली आहे.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाजासाठी योगाचा प्रसार करणाऱ्या आणि आरोग्यदायी जीवनशैली निर्माण करणाऱ्या डॉ. राधा तांबे यांचे योगदान खरोखरच प्रेरणादायी ठरले आहे.

# मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाने Digital Detox mahotsav २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला

### ● १० राज्य, ८७ शहरे, २५० शाळाम धून मारली बाजी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नावाजलेल्या राजस्थानी सेवा समाज बीड संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाने दिनांक १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे झालेल्या चेतना एम्पॉवरमेंट फाउंडेशन व हेमा फाउंडेशन च्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील वळसळींरश्र वर्शों चरहेींरीं २०२५ या स्क्रीन एडिशन हा गंभीर होत चाललेल्या विषयावरील नाटिकेत इयत्ता ३ व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी ३ री ते ६ वी या वर्गातील वयोगटात दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळवत संस्थेचे व शाळेचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले. देशातील दहा प्रमुख राज्यातील ८७ च्या वर शहरासह २५५ शाळा व कॉलेज यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या या सर्व नाटिकेत जवळपास १ हजार विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले होते.




यातुन मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाला दुसऱ्या क्रमांकाचे मोठे बक्षीस मिळाले. या बक्षीसाचे स्वरूप सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ३१ हजारांचे रोख पारीतोषिक होते. सध्या मोबाईल मुळे होणारे दुष्परिणाम व त्यातून आपल्या मुलांची कशी सुटका करता येईल? या विषयावर स्क्रीन टाईम ने छिना बचपन ही नाटिका सादर करण्यात आली होती. ही नाटिका शाळेचे मुख्याध्यापक श्री सोहनी सर यांच्या मार्गदर्शनाखाली व इयत्ता ३ व ४ थी च्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. प्रमुख भूमिकेत चि. घेणे समर्थ गणेश, चि.रिधम पुरूषोत्तम मालपाणी, कु. साहेबा सलीम शेख, चि.चांदणे राजवीर सतीश, चि. उपरे प्रथमेश गणेश होते. नाटीकेसाठी सौ.भंडारी मॅडम, सौ तौर मॅडम यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांना दोडे सर व लड्डा सर, पारीख मामा यांनी मदत केली. या नाटिकेसाठी पालकांनीही आपल्या विद्यार्थ्यांना व शाळेला प्रोत्साहन दिले.

# पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर

## अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया अधिवेशनात डॉ.भागवत कराड



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

पत्रकार हे वर्षानुवर्ष समाजासाठी काम करतात. त्यांच्या समस्या मी नेहमीच गांभीर्याने घेत असतो. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्यविषयक व रेल्वेविषयक समस्या सोडविण्यासाठी मी कसोशीने प्रयत्न करीन, असा विश्वास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात डॉ.भागवत कराड बोलत होते. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते.

यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मंजूरभाई शेख, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो.पी.लांडगे, लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेटे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिप अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ.भागवत कराड यांनी पत्रकारांच्या विविध समस्यांविषयी सोडवणूक करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व छोट्या-मोठ्या व्यवसायाला बळकटी देण्यासाठी मुद्रा लोन विषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख वक्ते तुळशीदास भोईटे व रवींद्र पोखरकर यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे यांनी ए.आय. आणि मराठी पत्रकारिता, या विषयावर तर डॉ.अनिल फळे यांनी डिजिटल मीडिया : श्वास महाराष्ट्राचा, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक,कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर यांनी केले.

# ना. छगनराव भुजवळ यांनी नाथापूरच्या देवडकर कुटुंवीयांना धीर देत केली आर्थिक मदत: अॅड. सुभाष भाऊ राऊत

### ●मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी समता परिषद स्वीकारणार! : बापूसाहेब भुजबळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नाथापूर येथील गोरख नारायणराव देवडकर (वय ५० वर्षे) यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण दिल्या गेल्याने आता ओबीसीचे आरक्षण संपणार!, माझ्या मुलींसाठी मी पाहिलेले स्वप्न पूर्ण होणार नाही या नैराश्यातून शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी गळफास घेऊन स्वतःचे



जीवन संपविले. या घटनेची तात्काळ दखल घेत ओबीसीचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ यांनी देवडकर कुटुंबीयांना धीर देत एक लाख रुपयाची आर्थिक मदत केली आहे. तसेच मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी देखील स्वीकारली आहे.

# सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर प्राणघातक हल्ल्याचा पाटोद्यात सर्वपक्षीय निषेध

**पाटोदा । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनीलभाऊ साळवे यांच्या कुटुंबावर नान्नज (ता. जामखेड) येथे झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा तीव्र निषेध पाटोदा येथे करण्यात आला. सोमवारी (दि. १५ सप्टेंबर २०२५) सकाळी अकरा वाजता तहसील कार्यालयासमोर विविध पक्ष व सामाजिक संघटनांच्या वतीने भव्य निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात विविध पक्षातील नेते, रिपब्लिकन पार्टीसह अनेक संघटनांचे कार्यकर्ते, पदाधिकारी व शेकडो नागरिक सहभागी झाले. सर्वांनी एकमुखाने दोषींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा करण्याची मागणी केली.आंदोलनादरम्यान हल्लेखोरांना शिक्षा करा!, साळवे



कुटुंबाला न्याय द्या! न्याय मिळाला नाही तर तीव्र लढा उभारू!अशा घोषणांनी तहसील परिसर दणाणून गेला. वातावरण संतप्त व तणावपूर्ण बनले होते. निदर्शनावेळी सर्वपक्षीय नेत्यांनी भाषणे करताना प्रशासनावर कठोर टीका केली. त्यांनी स्पष्ट केले की, हा हल्ला एका कुटुंबावर नसून संपूर्ण समाजावर आहे. दोषींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे. अन्यथा जिल्हाभर उग्र आंदोलन उभे राहील. तसेच साळवे कुटुंबाला शासकीय पातळीवर तात्काळ सुरक्षा पुरवण्याची मागणीही करण्यात आली. निदर्शनानंतर सर्वपक्षीय शिष्टमंडळाने तहसीलदारांना निवेदन सादर केले. या निवेदनात दोषींना अटक करून कठोर कारवाई करण्याचा ठाम इशारा देण्यात आला.या हल्ल्यामुळे समाजात भीती व संतापाचे वातावरण असून,दोषींना तात्काळ अटक न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७५९/२०२५**

**जिजाबाई रावसाहेब आडाळे विरूध्द- निरंक**

ज्याअर्थी मयत नामे सरस्वतीबाई इंदरराव काकडे हे दिनांक ०३.०१.२०२५ रोजी टाकळगव्हाण तरफ तालखेड ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत.

अर्जदार- १. जिजाबाई रावसाहेब आडाळे, वय ५५ वर्षे धंदा शेती व घरकाम, रा. भाटेपुरी ता. गेवराई जि. बीड, २. महादेव इंदरराव काकडे, वय ५२ वर्षे धंदा शेती, रा. टाकळगव्हाण तरफ तालखेड ता. गेवराई जि. बीड, ३. शहादेव इंदरराव काकडे, वय ५० वर्षे धंदा- शेती, रा. टाकळगव्हाण तरफ तालखेड ता. गेवराई जि. बीड , ४. इंदरराव कोंडीबा काकडे, वय ७० वर्षे धंदा शेती, रा. टाकळगव्हाण तरफ तालखेड ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ् गोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सरस्वतीबाई इंदरराव काकडे रा. टाकळगव्हाण तरफ तालखेड ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : २७.१०.२०२५

(मार्फत अॅड . पी एम पटेकर )

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ • पान ४

# लिंबागणेश ते बोरखेड मार्गावरील रस्ता खचल्याने वाहतूक ठप्प




## ग्रामस्थांची तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे लिंबागणेश-बोरखेड रस्ता खचला असून परिसरातील गावांतील व वस्तीवरील नागरिकांची दळणवळणाची मोठी अडचण झाली आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मुळे, सुरेश निर्मळ, संजय घोलप, विजय वाणी, तुकाराम गायकवाड आदी ग्राम स्थांनी केली आहे. तलाठी पोतदार आणि ग्रामविकास अधिकारी वीर यांच्याकडुन तहसीलदार हजारे यांना अहवाल सादर. तलाठी गणपत पोतदार आणि ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी खचलेल्या रस्त्याची व पुरस्थितीची पाहणी करून तहसीलदार चंदकांत शेळके व गटविकास अधिकाऱ्यांना यासंदर्भात अहवाल सादर केला आहे. या मार्गावर ७ गावे व १२ वस्त्यांचे दळणवळण अवलंबून असून शालेय मुले, दवाखाना, बाजारहाट, शेतीमाल व दुधदुभत्याच्या वाहतुकीसाठी हा रस्ता महत्त्वाचा आहे. मात्र, नळकांडी ▶ उर्वरित पान २ वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर उडडाण पुलाखाली पावसामुळे तयार झाले स्विमिंगपूल

**रेल्वेच्या कामाकरिता आलेले अधिकारी / इंजिनीयर कॉप्या करून पास झालेले**



### • आज महाविकास आघाडीचे अर्धनग्न आंदोलन

**आज दि. १६/०९/ २०२५ मंगळवार रोजी सकाळी ११ वा. वडवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे पुला खालील साचलेले पाऊसाचे पाणी तात्काळ काढण्या संदर्भात महाविकास आघाडीच्या वतीने अर्धनग्न आंदोलनचे निवेदन तहसीलदार साहेब, पोलीस स्टेशन वडवणी यांना देण्यात आले आहे. रेल्वे खालील पुलाच्या पाण्यामध्ये अर्धनग्न आदोलनास डोंगर पट्ट्यातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे.**

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील चिंचवण रोड वरील पावसात रेल्वे करिता तयार करण्यात आलेल्या वडवणी पुलाखाली पाणी साठले पावसाळ्यात याच पाण्यातून वडवणी, चिंचवण, चिखलबीड सर्कल मधील गावे व डोंगर पट्टातील सर्व नागरिकांना ये जा करावी लागते. दोन चार तास वाहतूक कोंडी झाली होती. स्वातंत्र्य उत्तर काळात मंजूर झालेली बीडची रेल्वे बिडकर यांच्या स्वप्नात २०२५ ला एक वेळेस धावली ज्यावेळी धावली त्यावेळी त्याची टेस्टिंग ▶ उर्वरित पान २ वर

# चौसाळा महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे सोयाबीन, तूर, कापूस, ऊस पिकाचे ८० टक्के नुकसान





**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा महसूल मंडळा अंतर्गत झालेल्या पावसामुळे अतिवृष्टीने पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्याकरिता चौसाळा तलाठी कार्यालयाचे तलाठी कमलेश निर्मळ यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली व पाण्यातील पिकांचे फोटो काढले. यामध्ये सोयाबीन, ऊस, तुरीचे, नुकसान झालेले पाहून तहसील कार्यालयाला ऑनलाइन माहिती कळविली. यावेळी शेतकरी व ग्रामस्थांकडून तात्काळ पंचनामे करण्याची मागणी करण्यात आली. चौसाळा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन दत्तात्रय(पिनू काका) नाईकवाडे, युवा नेते बाळासाहेब जोगदंड, नंदू आबा जोगदंड प्रवीण शिंदे, उमेश जोगदंड, प्रवीण पाटील, दीपक झोडगे, बाळू बारंगुळे,पत्रकार पंडित अण्णा जोगदंड, विकास नाईकवाडे हे उपस्थित होते. तर चौसाळा तलाठी कार्यालयाचे तलाठी कमलेश निर्मळ ▶ उर्वरित पान २ वर

# खरात आडगाव फाटा येथे ओबीसी समाजाचा भव्य रास्ता रोको

**भुजबळ साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ च्या घोषणांनी परिसर दणाणला**



**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने नुकताच एक जीआर काढून मराठा समाजाला हैदराबाद गॅजेट लागू करून ओबीसीतून आरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे यामुळे ओबीसी समाजावर मोठा अन्याय होणार आहे सदर जीआर रद्द करून मराठा समाजाचे ओबीसी आरक्षणावर होणारेअतिक्रमण थांबवण्यात यावे या मागणीसाठी आज खरात आडगाव फाटा येथे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी परिसरातून हजारोंच्या संख्येने ओबीसी बंधू उपस्थित होते भुजबळ साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला यावेळी माजलगाव पोलीस प्रशासनाचे वतीने चोक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता एक तास झालेल्या रास्ता रोको ने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या यावेळी माजलगावच्या तहसील कार्यालयातील नायब तशिलदार यांनी आंदोलन कर्त्याचे निवेदन स्वीकारले यावेळी माजलगाव तालुक्यातील बहुसंख्य ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित ▶ उर्वरित पान २ वर

# लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी वीरेंद्र सोळंके यांची निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था, माजलगावच्या चेअरमनपदी श्री. वीरेंद्र प्रकाशदादा सोळंके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या सभागृहात गुरुवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा ठराव एकमताने मंजूर झाला असून, एस. के. शेरखाने (सहकार अधिकारी, श्रेणी-२) यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण निवड प्रक्रिया नियमानुसार आणि पारदर्शकपणे पार पाडण्यात आली. विशेष म्हणजे, श्री. वीरेंद्र सोळंके हे आधीच लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून यशस्वीपणे कारभार पाहत आहेत आणि आता पतसंस्थेचे नेतृत्वही त्यांच्या हाती आल्यामुळे या दोन्ही महत्त्वाच्या सहकारी संस्थांचे ▶ उर्वरित पान २ वर



*पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी ता. जि. बीड या विद्यालयातील सहशिक्षक श्री. भरणे बी. आर. सर यांना रोटरी क्लब बीड सिटी आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार देताना माध्यमिक शिक्षण विभागाचे अधीक्षक मा. श्री अजित बहिर साहेब, रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री भागवत ढाकणे सर, पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी विद्यालयाचे आदरणीय मुख्याध्यापक श्री. प्रदीप जगताप सर शाळेतील श्री. श्री. जोशी सर , श्री. चौधरी सर, श्री. खटाने सर , श्री. नाईकवाडे सर , श्री. तेलप सर, सौ.तेलप मॅडम, श्री. संतोष खळगे सर, श्री. जाधव सर, श्री. डावकर सर, श्री.गव्हाणे सर, पत्नी सौ. प्रीती भरणे, तसेच सर्व सहकारी मित्र उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.*

## थोडक्यात...

### महाराष्ट्र पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष रासवे तर उपाध्यक्षपदी बालासाहेब उफाडे यांची निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष रासवे तर उपाध्यक्षपदी बालासाहेब उफाडे यांची सर्वांच्या मते निवड करण्यात आले असून गेवराई येथे ज्येष्ठ पत्रकार प्रचंड सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली असून या बैठकीमध्ये सर्वांच्या मते संतोष रासवे यांची माजलगाव तालुका अध्यक्षपदी तर बालासाहेब उफाडे, यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्र पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विलास जी कोळेकर यांच्या आदेशानुसार व बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब हुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता मध्ये अग्रेसर असणारे विविध प्रश्नावर वाचा फोडणारे संतोष रासवे व बालासाहेब उफाडे यांची यांच्या निवडीमुळे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळेल व पत्रकाराच्या विविध प्रश्नांसाठी योग्य दिशा देतील असा विश्वास ज्येष्ठ पत्रकार प्रचंड सोळंके यांनी बैठकी प्रसंगी व्यक्त केला. माजलगाव तालुका सदन तालुका असून तालुक्यात अनेक पत्रकाराचे प्रश्न आहेत. पत्रकार पेन्शन, पत्रकारांचे घरकुल, यासह पत्रकारावर होणारे हल्ले, व पत्रकारांच्या दैनंदिन अवस्था यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करीन असे मत नूतन अध्यक्ष संतोष रासवे व उपाध्यक्ष बाळासाहेब उफाडे यांनी निवडी दरम्यान आपले मत व्यक्त केले. यांच्या निवडीमुळे सर्व स्तरातून कौतुक होत असून माजलगाव मध्ये फटाकडे ,पेढे, वाटप करून नूतन अध्यक्ष व उपाध्यक्षाचे सत्कार करण्यात आले तसेच यावेळी संपादक,परमेश्वर सोळंके , सामाजिक कार्यकर्ते महादेव बाप्पा ताकट, निर्भीड पत्रकार संघाचे बाळासाहेब आडागळे, पत्रकार विष्णू उगले , अरविंद ओव्हाळ, पृथ्वीराज निर्मळ, अंगद दराडे, सुनील थोरात राम यादव, सरपंच भास्कर जाधव, मानवी हक्क अभियान चे युवा नेते रमेश गवळी यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### बीएस एन एल सल्लागार समितीचे सदस्य गणेश वरेकर यांनी घेतला बीड जिल्हाच्या बी.एस एन एल. चा आढावा



**बीड । प्रतिनिधी**

बीड. बीएस एन.एल. समितीच्या सल्लागार सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर गणेश वरेकर यांनी बीड जिल्ह्याच्या मुख्य कार्यालयात जाऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांची आढावा बैठक घेतली व बी.एस.एन.एल.च्या सर्व कामांचा आढावा घेतला, यावेळी अधिकार्यांनी विविध समस्या गणेश वरेकर यांना सांगितल्या यावेळी बोलताना गणेश वरेकर यांनी सांगितले की, मला सल्लागार समितीचे सदस्य नियुक्त केले आहे आता या खात्याला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहिल , आपल्या समस्या सोडविण्यासाठी मी मुंबई असो किंवा दिल्ली असो याठिकाणी स्वतः जाऊन आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीन यावेळी बी.एस. एन.एल.च्या वतीने गणेश वरेकर यांचा सत्कार करुन सन्मान करण्यात आला.समवेत शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी सरपंच सखाराम तात्या मोहिते, तसेच मनोहर कैवाडे डी.ई.पचिशम लीपश्र बीड,आसाराम सुपेकर डी.ई पुर्व बीड ,देवी सिंग आनारे डी.जी.एम.बीड.,विशाल रामपाल तिवारी जे.टी.ओ.बीड हे अधिकारी उपस्थित होते.

### वडवणी तालुक्यात शिवसेना पदाधिकारी निवड ; नियुक्तीपत्रांचे वाटप संपन्न !



**बीड । प्रतिनिधी**

हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने तसेच उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथजी शिंदे आणि खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या आदेशानुसार, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या सूचनेवरून शिवसेना वडवणी तालुक्यातील पदाधिकारी निवडी काल दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे दुपारी १.०० वाजता पार पडल्या. या निवडीदरम्यान विविध स्तरांवरील पदांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना त्यांची नियुक्तीपत्रे देऊन औपचारिक नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) गोंडे, रामदास ढगे, संदीप माने, शिवाजी गोंडे, मसुराम गोंडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवड प्रक्रियेने वडवणी तालुक्यातील शिवसेना संघटनेला नवे बळ मिळाले असून, नव्याने नियुक्त पदाधिकारी आगामी काळात शिवसेनेची विचारधारा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विकासाभिमुख कार्य घराघरांत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध राहतील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.